# शिव सागरमोती ॲग्रोटेक, अकोला

**पिक : सोयाबीन** **वाण : जे-एस-९३०५**

| अनु. क्र. | विवरण | तपशील |
|---|---|---|
| 01 | पिकाच्या वाणास योग्य कृषी विभाग | खरीप हंगाम 6,8,9 |
| 02 | जमिनीची निवड व जमिनची मशागत | मध्यम ते भारी जमीन, पुर्वीचे पीककाढल्यानंतर जमीन नांगराने वखारच्या उभ्या आडव्या पाळ्या देवून जमीन भुसभुशीत करावी. |
| 03 | बिज प्रक्रिया वेळ / रासायनिक औषधे | पेरणीपुर्वी बियाण्यास 3 ग्रॅम थायरम अथवा 1 ग्रॅम कार्बोन्डझीम + 2 थायरम याप्रमाणे बुरशीजन्य रोगांपासून संरक्षणा साठी बीज प्रक्रिया करावी आणि 4 ग्रॅम ट्रायकोडर्मा प्रति किलो या प्रमाणात लावावे. |
| 04 | पेरणीची वेळ | जुन, जुलैचा पहिला आठवडा |
| 05 | पेरणीकरिता लागणारे बियाणे-पेरणीची पध्दत (दोन ओळीतील व दोन रोपांमध्ये अंतर ठेवून /पेरणी) | 70 ते 75 टक्के उगवणशक्तीचे प्रति हेक्टरी 75 किलो बियाणे वापरावे. दोन ओळीतील अंतर 30 सें मी व दोन झाडातील अंतर 8 सें.मी. ठेवावे पेरणी सरत्याने करावी. |
| 06 | रासायनिक खते मात्रा व खत देण्याचा कालावधी व वेळ | हेक्टरी 30 किलो नत्र व 75 किलो स्फुरद वापरावे. |
| 07 | तण नियंत्रण - रासायनिक औषध व मात्रा व वेळ | फल्युक्लोरॅलनी (बासालीन 45% इ.सी. क्रियाशील घटक 0.75 - 1.0 किलो प्रति<br>हेक्टर पेरणीपुर्वी फवारावे व पेंडिमेथॅलीन (स्टॉम्प 30 % इ.सी) क्रियाशील घटक 1.0 किलो प्रति हेक्टर उगवणपूर्वी फवारणी करावी. |
| 08 | रोग व किड नियंत्रण रासायनिक औषध मात्रा व वेळ | खोडमाशी - ट्रायझोफॉस 40 % प्रवाही 10 मि.ली किंवा क्लोरोपायरीफॉस 20 % प्रवाही 20 मि.ली. 10 लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. पांढरीमाशी, चक्रभुंगा -डायमेथोएट 30% प्रवाही 10 मि.ली. किंवा एन्डोसल्फान 35 % प्रवाही 15 मि.ली. 10 लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. हिरवी उंटअळी, तंबाखुची पाने खाणारी अळी, केसाळ अळी आढळल्यास मिथील पॅराथिऑन 2 % भुकटी किंवा क्विनॉलफॉस 1.5 % भुकटी हेक्टरी 20 किलो या प्रमाणे धुरकणी करावी. |
| 09 | पाणी देण्याचे वेळापत्रक | शेंगा भरल्यावेळी 1 ते 2 वेळा पाणी देणे |
| 10 | पिक काढण्याचा तपशील | दाणे भरल्यानंतर मळणी यंत्राने पिक काढावे. |
| 11 | वाणाचे गुणवत्ता विषयक गुणधर्म | 95 ते 100 दिवसांत तयार होते. भारी जमिनीसाठी अति उत्तम |
| 12 | अपेक्षीत उत्पन्न | 25 ते 30 क्विंटल प्रति हेक्टर |